सायंदैनिक
# सांजवार्ता

औरंगाबाद, बुधवार दिनांक ६ ऑक्टोबर २००४

# आरेफ कॉलनीत इंडस बालकामगार शाळेचे उद्घाटन





*इंडस् बाल कामगार शाळेच्या उद्घाटना प्रसंगी बोलताना संस्थेचे प्राचार्य साजिद पाशाह दिसत आहे, सोबत कल्पना भगत, शाह सुरैय्या खान, सहा. कामगार आयुक्त अरूण जोशी, प्रकल्प संचालक पॅट्रीक मार्टिन व असंख्य बालकामगार मुले व मुली दिसत आहे.*

<u>औरंगाबाद (प्रतिनिधी)</u> - आझाद अली शाह शिक्षण संस्थेच्या वतीने राष्ट्रपिता महातमा गांधी यांच्या जयंती निमित्त आरेफ कॉलनी येथील मनपा सभागृहात इंडस् बालकामगार शाळेचे उद्घाटन मोठ्या थाटात, उत्साहात संपन्न झाले.

या इंडस् बालकामगार प्रकल्पा अंतर्गत संक्रमण शाळेचे (बालकामगार शाळा) उद्घाटन प्रकल्पाचे महाराष्ट्र संचालक पॅट्रीक मार्टीन यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संपन्न झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक कामगार आयुक्त अरूण जोशी हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडस प्रकल्पाचे अधिकारी आनंद खोब्रागडे, रंजित देशमुख, मेराज सिद्दीकी, संजय करंजकर, गौतम कदम आदी मान्यवर उपस्थित होते. त्याच बरोबर आझाद अली शाह शिक्षण संस्थेचे अध्यक्षा शाह सुरैय्या खान व प्राचार्य साजिद पाशा हे उपस्थित होते, आलेल्या पाहूण्यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीप प्रज्वलन करून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन केले व कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

यावेळी पाहुण्यांसाठी स्वागतपर गीत शाळेतील शिक्षीका सविता रगडे यांनी आपल्या मधुर आवाजामध्ये सादर केले व आलेल्या सर्वपाहुण्यांचे पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात इंडस प्रकल्पाबद्दल, संस्थेचे अहवाल व उपक्रमाबद्दल इत्यंभूत माहिती संस्थेच्या अध्यक्षा शाह सुरैय्या खान यांनी करून दिली. या प्रसंगी महात्मा गांधींच्या अहिंसा विषयक तत्त्वाबद्दल व सर्व धर्म समभावनेच्या दृष्टीने मानवता कशी असावी, या विषयावर सविस्तरपणे भाषण संस्थेचे प्राचार्य साजिद पाशा यांनी देऊन विविध प्रकारचे उदाहरणे उद्धृत करून आलेल्या पालक, प्रेक्षक व पाहुण्यांचे शंकेचे निरसन करून सर्वांची मने जिंकली. प्रकल्प संचालक पॅट्रीक मार्टीन यांनी विद्यार्थ्यांशी व पालकांशी वेगवेगळ्या विषयावर खुली चर्चा करून त्यांना इंडस प्रकल्पाबद्दल योग्य मार्गदर्शन केले. सहाय्यक कामगार आयुक्त अरूण जोशी यांनी संस्थेने केलेल्या कामाची स्तुती व प्रशंसा करून शुभचिंतिते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत आव्हाड व कल्पना भगत यांनी केले तर आभार प्रदर्शन हेमा [illegible] कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.